divyamarathi.com

**चर्चासत्र** • वाघ अभियांत्रिकीत आंतरराष्ट्रीय आयसीमॅक्स परिषद

# गुणवत्तावाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक

## ऑनलाइन चर्चसित्रात माजी प्राचार्य डॉ. वसंत डी. बर्वे यांचे मार्गदर्शन

**प्रतिनिधी** | नाशिक

औद्योगिक उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी उत्पादनाच्या गुणवत्तावाढीसाठी इंटरनेट ऑफ थिंग्स, नेटवर्किंग, क्लाउड कॉम्प्युटिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता असून त्या सॉफ्टवेअर्सचा अधिकाधिक वापर करून शिक्षण व संशोधन क्षेत्रांत आमूलाग्र विकास करावा, असे मत माजी प्राचार्य डॉ. वसंत बर्वे यांनी व्यक्त केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रोबोटिक्स, ऑटोमेशन व प्रॉडक्शन इंजिनिअरिंग विभागातर्फे दि. १७ व १८ सप्टेंबर २०२१ रोजी आयसीमॅक्स-२०२१ या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे ऑनलाइन पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उद्घाटन माजी प्राचार्य



डॉ. वसंत डी. बर्वे व डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स टेक्नॉलॉजी येथील मेकॅनिकल विभागाचे विभागप्रमुख डॉ. दिनेशसिंग ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर आणि विविध राज्यातील नामांकित संशोधन व शैक्षणिक संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी एकूण १५ संशोधनपर शोधनिबंध सादर करण्यात आले, तसेच प्रस्तुत झालेल्या सर्व लेख व इ-बुकचे अनावरण करण्यात आले.

डॉ. दिनेशसिंग ठाकूर यांनी क्लाउड आधारित इंडस्ट्री ४.० चा दृष्टिकोन हा वस्तूच्या विशेष रचना व वस्तूच्या उत्पादनावर कसा होऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन केले. या चर्चासत्राचे विभाजन हे तीन सत्रात करण्यात आले. प्रथम सत्रात इंटेलिजंट मॅन्युफॅक्चरिंग सिस्टिम, दुसऱ्या सत्रात रोबोट अॅनालिसिस, डिझाइन व तिसऱ्या सत्रात मटेरियल्स अँड मॅन्युफॅक्चरिंग प्रक्रिया यांवर आधारित शोधनिबंधांचे सादरीकरण करण्यात आले. या तीन सत्रांसाठी डॉ. पी. बी. कुशारे, डॉ. महेश शेलार व डॉ. विजय पाटील यांनी अध्यक्षस्थान भूषविले. चर्चासत्राचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. शिरीष साने यांनी केले, तर चर्चासत्राबद्दलची माहिती रोबोटिक्स अँड ऑटोमेशन व प्रॉडक्शन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. पी. जे. पवार यांनी दिली. यावेळी प्रा. मंगेश खाल्कर यांनी आभार मानले.

divyamarathi.com

# इंजिनिअरिंग, फार्मसी व कृषी पदवी अभ्यासक्रमांची सीईटी सुरू, ८,२०७ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**प्रतिनिधी** | नाशिक

इंजिनिअरिंग, फार्मसी व बी.एस्सी कृषी या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता एमएचटी-सीईटी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने सुरू झाल्या. दररोज दोन सत्रात सुरू असलेल्या या परीक्षेत बुधवारी (दि. २२) दुपार सत्रापर्यंत ८ हजार २०७ विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. तर एक हजार विद्यार्थी गैरहजर होते. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील १३ केंद्रांवर पीसीएम या ग्रुपची परीक्षा सुरू आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे सीईटी घेतली जात असून जिल्ह्यातील १३ केंद्रांवर २० सप्टेंबरपासून सकाळ व दुपार अशा दोन सत्रात या परीक्षेला सुरुवात झाली. येत्या १ ऑक्टोबरपर्यंत ती चालणार आहे. पहिल्या टप्प्यात २५ सप्टेंबरपर्यंत पीसीएम ग्रुपची परीक्षा होईल. दुसऱ्या टप्प्यात २५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत पीसीबी ग्रुपची परीक्षा ऑनलाइन स्वरूपात पार पडेल. या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांनी राज्य सामायिक परीक्षा कक्ष यांच्या संकेतस्थळाला भेट देऊन हॉल तिकीट डाउनलोड करून त्याची प्रिंट काढून घ्यावी, अशी सूचना तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक ज्ञानदेव नाठे यांनी केली आहे. तसेच परीक्षा संबंधित सर्व सूचना विद्यार्थ्यांनी अवगत करून घ्याव्यात. त्यामुळे ऐनवेळी कोणाचीही तारांबळ उडणार नाही, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी भागवत डोईफोडे यांनी केले आहे. परीक्षेच्या अगोदर सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या परीक्षा केंद्राबाबतची सर्व माहिती तपासून व खात्री करून घ्यावी, अशी सूचना जिल्हा संपर्क अधिकारी सचिन पडवळ यांनी सर्व विद्यार्थ्यांना केली आहे.

लोकसत्ता | रा ज्य

# स्थापत्य अभियांत्रिकीच्या मुलाखती ऑक्टोबरपासून

## ‘एमपीएससी’ लवकरच वेळापत्रक जाहीर करणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) स्थापत्य अभियांत्रिकी पदाच्या सुधारित निकाल यादीनंतर भरती प्रक्रियेतून बाद झालेल्या एका उमेदवाराने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याने मुलाखती रखडल्या होत्या. मात्र, आता न्यायालयाने हा मार्ग मोकळा केला असून न्यायालयाच्या अधीन राहून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून स्थापत्य अभियांत्रिकीच्या मुलाखती एमपीएससी घेणार आहे.

स्थापत्य अभियांत्रिकीच्या ११४५ जागांसाठी सुरुवातीला ३६०० उमेदवारांची निवड करण्यात आली होती. ५ जुलैच्या शासन निर्णयानुसार या ११४५ जागांमध्ये एसईबीसी प्रवर्गासाठी असलेल्या १३ टक्के जागा खुल्या वर्गामध्ये रूपांतरित करण्यात आल्या. यानंतर ईडब्ल्यूएस प्रवर्गातील कमी गुण असणारे काही उमेदवार वगळले गेले. यातील एका उमेदवाराने मुंबई उच्च न्यायालयामध्ये सुधारित यादीला आव्हान देणारी याचिका दाखल केली. मात्र, सुधारित याद्या या सर्वोच्च न्यायालयाचा ५ मेचा निकाल आणि ५ जुलैच्या शासन निर्णयाच्या अधीन राहून होत असल्याने एका सुनावणीत निकाली निघणाऱ्या याचिकेसाठी वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप उमेदवारांकडून होत होता. विद्यार्थ्यांचा वाढता दबाव बघता यासंदर्भात आयोग सकारात्मक असून मुलाखती घेण्यासाठी न्यायालयाला विनंती केली जाणार असल्याची माहिती एमपीएससीचे सदस्य डॉ. दयावान मेश्राम यांनी ट्विटरच्या माध्यमातून दिली होती. त्यानंतर आयोगाने दोन दिवसांआधी न्यायालयाला स्थापत्य अभियांत्रिकीच्या मुलाखतीसाठी विनंती केली. ती मान्य करण्यात आली आहे. यामुळे न्यायालयाच्या अधीन राहून आता एमपीएससी स्थापत्य अभियांत्रिकीच्या मुलाखती घेणार आहे. या मुलाखती ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून डिसेंबरपर्यंत चालणार आहेत. दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मुलाखती होणार असल्याने विद्यार्थ्यांनीही समाधान व्यक्त केले आहे.

लोकसत्ता Thu, 23 September 2021
https://epaper.loksatta.com/c/63298887